INDIAN INSTITUTE OF INFORMATION TECHNOLOGY (IIIT) NAGPUR

# EK BHARAT SHRESHTHA BHARAT PROGRAM at IIIT NAGPUR

## Action Report, January 2021

## Marathi Scripting Competition

30th January, 2021

Marathi is an Indo-Aryan language spoken predominantly by around 83 million Marathi people of Maharashtra, India. It is the official language and co-official language in the Maharashtra and Goa states of Western India. Marathi is derived from Sanskrit through a Prakrit dialect called Maharashtri in the 1st-2nd centuries AD. It was the most widespread Prakrit dialect of its time. Maharashtri gradually evolved into Marathi in the 15th and 16th centuries.

IIIT Nagpur, is a college situated in Maharashtra State and therefore to celebrate this language, a scripting competition was organized by EBSB Club in which the college students who spoke Marathi showed active participation in it by writing some beautiful poems and essays.

Dr. Kirti Dorshetwar was the judge of the event and she found the some of the essays was very good and she appreciated all the students who participated in the event. Dr. Deepmala Baghel and Mudit Gupta, coordinated the whole event.

Krushna Patil was declared as the winner of the event, who wrote a poem on the topic diyali which is called panati in marathi. It tells us on how to bring light in others life. Pallavi Dhakne won the second prize ans she wrote an essay on the topic story of life which depicts different emotions of a person life.

Some of the Scripts are given below

## पणती

आणली पणती, पेटवली वाती,
प्रकाशमान झाल्या ज्योती ॥१॥

या प्रकाशात दिसतात का माणूसकीची रत्ने
माणुसकीची मोती ॥२॥

नष्ट करण्या अंधाराची छाया, सत्याचा मार्ग शोधावया
उपयोगी आल्या का या प्रकाशाच्या ज्योती ॥३॥

चोहो बाजूनी माणूस वेढला, ज्याचे त्याचे मनी एक विकृती
बलात्कार, भ्रष्टाचाराला नाही गणती ॥४॥

आपुल्याच प्रकाशांत तिन पांप पाहिली किती
ती दिसू नयेत म्हणून तिचा गळा घोटूनी
सत्याला कोणी दिली मूठमाती ॥५॥

तुम्हाला सत्पथाचा मार्ग दाखविण्या
झगडते इवलीसी पणती मिणमिणती ॥६॥

# विझलो आज जरी मी.

विझलो आज जरी मी
हा माझा अंत नाही
पेटेन उद्या नव्याने
हे सामर्थ्य नाशवंत नाही.

छाटले जरी पंख माझे
पुन्हा उडेन मी
अडवू शकेल मला
अजून अशी भिंत नाही.

माझी झोपडी जाळण्याचे
केलेत कैक कावे
जळेल झोपडी अशी
आग ती ज्वलंत नाही.

रोखण्यास वाट माझी
वादळे होती आतूर
डोळ्यांत जरी गेली धूळ
थांबण्यास उसंत नाही.

येतील वादळे खेटेल तुफान
तरी वाट चालतो
अडथळ्यांना भिवून अडखळणे
पावलांना पसंत नाही.

# काही गोष्टी आयुष्याबद्दल

माणूस रंग जितक्या सहजतेने बदलतो तितक्याच सहजतेने जर प्रेमही व्यक्त करू शकला असता तर जगायला खरंच किती मजा आली असती ना! कारण माणसाच्या निम्म्या समस्या या व्यक्त केलेल्या रागामुळे आणि कधीच व्यक्त न केलेल्या प्रेमामुळे वाढतात. शब्द बोलताना शब्दांना धार नको तर आधार असला पाहिजे कारण ~~आधार~~ धार असलेले शब्द मन कापतात तर आधार असलेले शब्द मन जिंकतात. निर्णय चुकतात आयुष्यातले अन् कधी आयुष्य चुकत जातं. प्रश्न कधीकधी कळत नाही ~~उत्तर~~ उत्तर मात्र चुकत जातं. सोडवताना मात्र सुटत जातो गुन्ता. सोडवताना मात्र सुटत जातो गुन्ता पण प्रत्येक वेळी नवीन वाट बनत जाते. दाखवणाऱ्याला वाट माहीत नसते चालणाऱ्यांचं ध्येय मात्र सुटत जातं. दिसतात तितक्या सोप्या नसतात काही गोष्टी, दिसतात तितक्या सोप्या नसतात काही गोष्टी अनुभव म्हणजे काय? हे तेव्हाच कळतं. असे मित्र बनवा जे कधीच साथ सोडणार नाही, असे प्रेम करा ज्यात स्वार्थ असणार नाही, असे हास्य बनवा ज्या रहस्य असणार नाही असे हृदय बनवा ज्याला तडा सहणार नाही, आणि असा स्पर्श करा ज्याने जखम होणार नाही.

आयुष्यात असे व्यक्ती जोडा जे वेळ येईल तेव्हा तुमची सावली आणि वेळ येईल तेव्हा तुमचा आरसा बनतील कारण आरसा कधी खोटं बोलत नाही अन् सावली कधी साथ सोडत नाही. कोणी कसं दिसावं यापेक्षा कोणी कसं असावं याला ~~फार महत्त्व आहे~~ फार महत्त्व आहे ते शक्य नसेल तर जास्तीत जास्त कसं नसावं याला फार महत्त्व आहे

"स्वप्नं पूर्ण झाले नाही" म्हणून रडायचं नसतं, रंग उडाले म्हणून चित्र फाडायचं नसतं फक्त लक्ष्यात ठेवायचं असतं आयुष्यात सगळंच काही आपलं नसतं. आपल्या दुःखात कधीतरी दुसऱ्याचं सुख असतं त्यालाच पाहून समाधानी व्हायचं असतं छोट्याशा या आयुष्यात खूप काही हवं असतं पण पाहिजे ते मिळत नसतं. असंख्य चांदण्यांनी भरून सुद्धा आपलं आभाळ मात्र रिकाम असतं.

हव्या असलेल्या सर्वच गोष्टी माणसाला मिळतातच असे नाही पण न मिळणाऱ्या गोष्टीच माणसाला का हव्या असतात? यांच उत्तर सुरेश भटांनी सांगितलंय " आयुष्य छान आहे थोडं लहान आहे, रडण्यात काय अर्थ लढण्यात शान आहे काट्यातही फुलांची झुलती कमाल आहे बदलून हे हवं दुनिया दुकान आहे." जगणे निरर्थक म्हणतो तो बेईमान आहे. आयुष्यात कधी-कधी हसावं लागतं तर कधी-कधी रडावंही लागतं (2) कारण सुंदर धबधबा बनायला पाण्यालाही उंचावरून पडावं लागतं.

चारचौघात बसल्यापेक्षा कधीतरी समुद्र किनाऱ्यावर जाऊन बसा आठवणींना घेवून बसा आयुष्य जास्त सुंदर वाटतं. आपल्याला कोण ~~स्वास~~ हवंय यापेक्षा आपण कोणाला हवंय याचाही कधीतरी विचार करायचा असतो.

आकाशातले तारे कधीच मोजून होत नाही माणसाच्या गरजा कधीच ~~संपत~~ संपत नाही. शक्य तितके तारे मोजत समाधानी राहावं आयुष्य जास्त सुंदर वाटतं. आयुष्यातली सर्वात मौल्यवान गोष्ट म्हणजे आनंद. गंमतीची गोष्ट अशी की मौल्यवान असूनही देवाने आपल्याला नामुल्य दिलेली आहे आणि त्याहूनही गंमतीची गोष्ट अशी की काही लोकांना आयुष्य ~~सं~~ संपेपर्यंत त्याचा पत्ताच नसतो. उगवणाऱ्या प्रत्येक दिवसाला आनंदाने सामोरे जा. मावळताना तो तुम्हाला भरपूर समाधान देऊन जाईल. आनंद हा उडणाऱ्या फुलपाखरा सारखा असतो त्याचा पाठलाग केला की तो दूर पळतो आणि निश्चिंत होऊन बसला की अलगद आपल्या खांद्यावर येऊन बिलगतो. प्रश्न सुटण्या सारखा असेल तर काळजी करण्यासारखं काय! आणि तो सुटत नसेल तर काळजी करून उपयोग काय ~~पसम~~ पराभवाने माणूस संपत नाही प्रयत्न सोडतो तेव्हा तो संपतो. कठीण काळात सतत स्वतःला सांगा " शर्यत अजून संपलेली नाही. कारण मी अजून जिंकलेलो नाही."

धन्यवाद !!

# माझा शेतकरी बाप #

रानावनात, उन्हा-तान्हात
राबतो तो माझा शेतकरी बाप.

स्वःताच्या पोटाला चिमटा घेऊन
मुलांना पोसणारा माझा शेतकरी बाप

त्याच्या आयुष्याच्या वाटेत नुसते काटे

पाऊस येत नाही, पिकाला भाव नाही,
शेतीसाठी लागणारे भांडवल ही
पुरेसे नाही,
काय करावे कसे करावे
हिशोबाला कागद-आणि पेन नाही.

समुद्राच्या भरती आणि ओहटी प्रमाणे
सतत धडपडत राहणारा माझा तो
शेतकरी बाप.

# आई #

आई म्हणजे काय असते ?

उन्हाच्या कडाक्यात शितलतेची छाव असते.

गरम तव्यावरच्या नरम भाकरीचा स्वाद असते.

~~लहानलेल्या~~ तहानलेल्या साठी पाणी तर भुकेलेल्या साठी भोग असते.

डोक्यावर प्रेमाचा, आपुलकीचा हात असते.

आई म्हणजे देवाने पाठवलेल्या दुत असते.

The students wrote in a variety of areas, and depicted their thoughts on various subjects which enhanced their writing skills and thinking ability.

End of Report